महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रु–मार्च २०२७ लेखी परीक्षा आयोजनाबाबत...

प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रु–मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी, प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

अ. क्र.	तपशील	उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कालावधी	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी
१)	लेखी परीक्षा	सोमवार, दि. ०८ फेब्रुवारी, २०२७ ते मंगळवार, दि. १६ मार्च २०२७	सोमवार, दि. १५ फेब्रुवारी,२०२७ ते गुरुवार, दि. ११ मार्च, २०२७
२)	प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन	बुधवार, दि. २० जानेवारी २०२७ ते शनिवार, ०६ फेब्रुवारी २०२७	गुरुवार, दि. २८ जानेवारी २०२७ ते शनिवार, १३ फेब्रुवारी २०२७

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी–मार्च २०२७ च्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या संभाव्य तारखा जाहीर करण्यात येत आहेत.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व लेखी परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०९/२०२६

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.मुंविमं/माध्य.प.उच्च माध्य.प (४७९)
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक - १८ / ०९ /२०२६

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
मुंबई /बृन्हमुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक/ प्रचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रतिः–
मुख्याध्यापक /प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः–
१) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
३) शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई.
४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण,
यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.